महाराष्ट्र शासन
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अलिबाग, जि. रायगड.
जिल्हा सामान्य रुग्णालय परिसर, बीच रोड, अलिबाग. जि.रायगड
Email- deangmcalibag@gmail.com Phone No.02141-29921 www.gmchalibag.in/gmch

जा.क्र.शावैमअ/दरपत्रक/Flap Chair/ १८३६ /२०२५ दि. ०१/०७/२०२५

दरपत्रक मागणी पत्र.

प्रति,

-----------------------

-----------------------

-----------------------

विषय :- शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय ,अलिबाग-रायगड संस्थेकरीता औषधशास्त्र विभागांस अत्यावश्यक साधनसामग्रीची खरेदी करीता दरपत्रके मोहोरबंद लिफाफे सादर करणेबाबत.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अलिबाग-रायगड या संस्थेतील औषधशास्त्र विभागास अत्यावश्यक साधनसामग्रीची सदरील विभागाला वैद्यकीय शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांकरीता अध्यापन सुलभ पध्द्तीने पार पाडण्यासाठी सदरील विभागास अत्यावश्यक साधनसामग्रीची खरेदी करणे आत्यावश्यक आहे. त्या अनुषंगाने खालील नमुन्यात मोहरबंद लिफाफा विहित मुदतीत या कार्यालयाच्या आवक शाखेत खालील अटी व शर्ती नुसार सादर करावेत.

| | Particulars | Specifications | Quantity | Unit Price |
|---|---|---|---|---|
| औषधशास्त्र विभाग | | | | |
| 1. | Flap Chair | Item width side to Side - 30.5D*30.5W*45.7H<br>Base Material - Metal<br>Top Material - Engineered Wood<br>Desk Design - Writing Desk<br>Colour - Black<br>Item Height - 45.72 centimetre<br>Bed Type - Folding Chair<br>Included Components - Study Chair with Writing Pad. | 01 | Including All Taxes |

अ.नं.

१. दरपत्रक मोहरबंद लिफाफा, दि.०८/०७/२०२५ रोजी ०५:०० वाजेपर्यंत कार्यालयास पोहचतील या बेताने पाठवावे. जाहीर केलेल्या तारखेनंतर अथवा कार्यालयीन वेळेनंतर आलेले दरपत्रक विचारत घेतले जाणार नाही / ग्राहय धरले जाणार नाही.

२. दरपत्रक मोहोरबंद लिफाफा अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अलिबाग.जि. रायगड यांचे नावे विहित मुदतीत या कार्यालयास सादर करावा. त्याचप्रमाणे दरपत्रक मोहरबंद लिफाफयावर साधनसामग्री करिता दरपत्रक लिहुन सादर करावे.

३. लिफाफयावर डाव्या बाजूस दरपत्रक क्र, लिफाफा जमा करण्याचा अंतिम दिनांक, दरपत्रक धारकाच्या नावाचा शिक्का इ. नमुद असणे आवश्यक आहे.

४. दरपत्रक ग्राहय कालावधी हा पुरवठा आदेश नोंदविलेल्या दिनांका पासुन सहा (०६) महिन्यांचा राहील.

५. प्रस्तावित उदिदष्टांकरिता दरपत्रक आकारण्यात आलेले दर हे बाजारभावापेक्षा अधिक नसावेत.सर्वात कमीतकमी दराचे दरपत्रकाचा विचार करण्यात येईल.

६. सदर साधनसामग्री किंमत, सर्व करांसहीत एकुण किंमत अशी दर्शविण्यात यावी. दरपत्रकात खाडाखोड करण्यात येवू नये.

७. दरपत्रक माहोरबंद लिफाफयात सादर करावयाचे दस्ताऐवज (Documents) अधिकृत लेटर हेडवर दरपत्रक सादर करावे. १) दुकानाचा परवाना, २) व्यवसाय नोंदणी प्रमाणपत्र, ३)जी.एस.टी.क्रमांक पत्र.४) पॅनकार्ड क्रमांक.

८. सदर साधनसामग्री ही इतर कोणत्या ही शासकीय संस्थेस पुरवठा केल्याचे प्रमाणपत्र असल्यास प्राधान्य.

९. ज्या पात्र दरपत्रकदारकाचे दर हे न्यूनतम असतील अशा यशस्वी दरपत्रकदारकास आवश्यकतेनुसार साधनसामग्री चा पुरवठा करण्याचे आदेश देण्यात येतील.

१०. सदरील साधनसामुग्रीचे दरपत्रक सादर करणे आधी नमुना प्रात्यक्षिक दाखविणे बंधनकारक आहेत तसेच संबंधित विभाग प्रमुखाकडून साधसामुग्रीचा समाधानकारक अहवाल प्राप्त करुन तो मोहरबंद दरपत्रकामधे सादर करणे बंधनकारक राहील.

११. नमुना प्रात्यक्षिकात आणलेल्या व सादर केलेल्या साधनसामुग्री पुरवठा, खरेदी आदेश मिळाल्यानंतर करणे आवश्यक आहे.नमुने व प्रात्यशिक मालाचा पुरवठा यामध्ये तफावत आढळल्यास पुरवठा स्विकारले जाणार नाही व संबंधित पुरवठा दारास दोन वर्षा करिता वर्ज्य सुचित केले जाईल.

१२. अपवादात्मक परिस्थितीमुळे उक्त कोणत्याही अटीत आवश्यतेनुसार अंशत: बदल करणे अथवा प्राप्त झालेली दरपत्रके कोणतेही कारण न देता स्वीकारणे/नाकारणे तसेच कोणतेही स्तरावर खरेदी प्रक्रिया रद्द करणे इ. अधिकार संस्थाप्रमुख (अधिष्ठाता) यांनी राखून ठेवले आहेत.

१३. काम पुर्ण झाल्यानंतर तीन प्रतीत देयके अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,अलिबाग जि. रायगड यांचे नावाने देण्यात यावेत. (With Revenue Stump)

१४. देयकाची अदायगी ही शासनाकडून अनुदान प्राप्त होण्याच्या अधीन राहून करण्यात येईल. देयक अदा करण्यास विलंब झाल्यास त्यावर कोणत्याही प्रकारचे विलंब शुक्ल अदा केले जाणार नाही.

१५. वरील नमूद साधनसामग्री नग संख्या ही मा. अधिष्ठाता यांच्या आदेशान्वये/प्रशासकीय उपलब्धतेनुसार कमी किंवा वाढवली जाऊ शकते.

१६. पुरवठादारकाचे पूर्ण नाव, भ्रमणध्वनी आणि संपूर्ण पत्ता, सांकेतांक क्र.(Email address along with Website) हा Envelope वर नमूद असणे आवश्यक आहे.

अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
अलिबाग रायगड

प्रत - शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, तसेच जिल्हा सामान्य रुग्णालय, अलिबाग-रायगड यांच्या सुचना फलकावर दरपत्रक मागविण्या संदर्भात दिनांक :- ०१/०७/२०२५ सुचना देण्यात आल्या आहेत.